महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा), गट-ब
<u>मधील अधिकाऱ्यांचे बदली आदेश रद्द करण्याबाबत</u>
उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक : ईएसटी-३९१७/प्र.क्र.२४/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०३ एप्रिल, २०१८

वाचा- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, समक्रमांक शासन आदेश दिनांक ७०.७२०१७.

शासन आदेश -

महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील अध्यापकीय पदे वगळण्यात आल्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी प्रशासन शाखेच्या पदाचा विकल्प दिलेला आहे अशा १२ अधिकाऱ्यांची दिनांक ७.०७.२०१७ रोजीच्या आदेशान्वये बदली करण्यात आली आहे.

२. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ६३१/२०१७ मध्ये दिनांक ९.०२.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार, दिनांक ७.०७.२०१७ रोजीचे आदेश सक्षम प्राधिकारी लगतच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता निर्गमित करण्यात आले असल्यामुळे ते बेकायदेशीर ठरविले आहेत. सबब, दिनांक ७.०७.२०१७ रोजीच्या आदेशान्वये उपशिक्षणाधिकारी संवर्गातील अध्यापकीय पदावर कार्यरत असलेल्या व प्रशासन शाखेचा विकल्प दिलेल्या १२ अधिकाऱ्यांचे बदली आदेश रद्द करण्यात येत आहेत.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०४१२३०१२४५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.04.04 18:12:43 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

३. सर्व संचालक

४. सर्व विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

६. संबधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)

७. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी / अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

८. संबंधित अधिकारी आयुक्त कार्यालयामार्फत

प्रत माहितीसाठी अग्रेषित,

१) मा. मंत्री (शा.शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

२) मा. प्रधान सचिव (शा.शि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

३) निवडनस्ती